# महाराष्ट्र शासन

दूरध्वनी क्र. : २२७९३१०१
Email: jsa.wcd-mh@nic.in
narayan.karad@nic.in

क्रमांक: जशिअ- २०१७/प्र.क्र. २३३/जल-७
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक : २० मे, २०१७ .

प्रति,

सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी

**विषय: जलयुक्त शिवार अभियान व जलसंधारणाच्या अन्य उपचारा संदर्भात जलसंधारण विभागाचे मापदंड वापरण्याबाबत**

महोदय,

राज्यात वारंवार उद्भवणाऱ्या टंचाई परिस्थितीवर कायमस्वरुपी उपाययोजना म्हणून जलयुक्त शिवार अभियान दि. ५ डिसेंबर २०१४ च्या शासन निर्णयान्वये राबविण्यात येत आहे. या अभियानात जलसंधारण, जलसंपदा, कृषि, जिल्हा परिषद, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, वन विभाग, सामाजिक वनीकरण, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, इत्यादी यंत्रणा म्हणून काम करीत आहेत.

पाणलोट क्षेत्र आधारित जलसंधारण कार्यक्रमासाठी मृद व जलसंधारणाची कामे मजूराच्या सहाय्याने करण्यासाठी शासन निर्णय जलसंधारण विभाग क्र.मापदंड-२०१३/प्र.क्र.११४/जल-७, दि. १० ऑक्टोबर २०१३ व कामे मशिनव्दारे करण्यासाठी शासन निर्णय जलसंधारण विभाग क्र. मापदंड-२०१३/प्र.क्र.११४/जल-७, दि. १५ ऑक्टोबर २०१३ अन्वये आर्थिक मापदंड निश्चित करण्या त आलेले आहेत.

मृद व जलसंधारण योजनांसाठी जलसंधारण विभागामार्फत उपरोक्त मापदंडाचा अवलंब करण्यात येत आहे. आपणास कळविण्यात येते की, जलयुक्त शिवार अभियान व जलसंधारणाची अन्य कामे करताना सर्व यंत्रणांनी केवळ वर नमूद शासन निर्णयान्वये निश्चित केलेल्या मापदंडाचाच अवलंब करावा.

आपला,

(वि.सि.वखारे)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) प्रधान मुख्य वनसंवरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर.
२) आयुक्त कृषि, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३) संचालक, भुजल सर्वक्षण व विकास यंत्रणा, पुणे.
४) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
५) मुख्य अभियंता, लघुसिंचन(जलसंधारण) मंडळ, पुणे.
६)संचालक,मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, पुणे.